# अवलिया

(नानकदेवांच्या चरित्रावरील ऐतिहासिक कादंबरी)

- लेखक -
**अनंत तिबिले**

**अजब पब्लिकेशन्स**
*भाऊसिंगजी रोड, कोल्हापूर - ४१६ ०१२*

▶ **अवलिया : अनंत तिबिले**

▶ ©
**सौ. उर्मिला तिबिले**

▶ **प्रकाशक**
अजब पब्लिकेशन्स्
भाऊसिंगजी रोड, कोल्हापूर
फोन : (०२३१) २५४६७१०

▶ **अक्षरजुळणी**
रविंद्र सावंत
मो. ९८५०३६४९१६

▶ **मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

▶ **मुद्रक**
श्रीपाद ऑफसेट, कोल्हापूर.
फोन नं. (०२३१) २६५०८०२

▶ **आवृत्ती**
जानेवारी २००९

▶ **किंमत**
रुपये ५५०/-

माझ्या लेखनाचा खटाटोप
माझे श्रम, माझं लेखनातील सातत्य
आणि माझ्या लेखनावरील वाचकप्रियता
अगदी जवळून १९७८ पासून ज्यांनी पाहिली,
दखल घेतली ते अजब पुस्तकालयाचे सर्वेसर्वा,
माझे मित्र श्री. उल्हासभाई मेहता यांना सविनय -

**- अनंत तिबिले**

## *थोडंसं अवलियाविषयी...*

त्या वेळी मी तब्बल एक महिना राजस्थान, मध्यप्रदेश, पंजाब आणि उत्तर प्रदेश या चार राज्यांचा धावता दौरा केला होता. अगदी बालपणापासूनच प्रवासाची आवड असलेला मी कधी सायकल, कधी एस्.टी. आदीने भटकत राहायचा. जिथं जाईन तिथली काही खास वैशिष्ट्ये, कथा, दंतकथा, लोककथा जमा करायचा. कित्येक वेळा त्यांची नोंदही करून ठेवायचा.

पंजाब पाहात असताना माझ्या मनात ज्या काही व्यक्तींनी घर केले त्यात प्रामुख्याने नानकदेव, गुरू गोविंदसिंह नि स्वातंत्र्यवीर भगतसिंह हे होते.

नानकदेवांचा काळ म्हणजे चौदाव्या शतकाचा उत्तरार्ध नि पंधराव्या शतकाचा पूर्वार्ध. तसं पाहिलं तर हा काळ उत्तरेतल्या हिंदूंच्या दृष्टीने मोठा आणीबाणीचा काळ होता. एक तर त्या वेळी उत्तरेत सत्ताधीश म्हणून यवन होते आणि त्यांच्या दृष्टीत हिंदू काफिरच होते. साहजिकच राज्यकर्त्यांकडून हिंदूंना सर्व प्रकारचा उपद्रव होत होता.

त्यांच्या जीवनाची शाश्वती नव्हती, त्यांच्याकडून वाटेल तसे कर वसूल केले जात होते. त्यांना बाटविणे, त्यांच्या लेकी-सुनांना पळविणे, त्यांच्यावर अत्याचार करणे, हिंदूंची घरे जाळणे, त्यांची इस्टेट पळविणे, मंदिरे फोडणे... हा इस्लामियांचा नित्याचाच कार्यक्रम आणि शासन यवनच असलेने या अत्याचारास निर्बंध येण्याची शक्यता कमीच होती.

साहजिकच हिंदू जीव मुठीत धरून जगत होता.

हिंदूपुढे केवळ एवढीच समस्या नव्हती. ते जुन्या रुढी-परंपरा यांनीही ग्रासलेले होते. जातिभेदाचा राक्षस तर त्यांना नित्यच सतावत होता.

स्वत:ला उच्चवर्णीय म्हणवून घेणारे ब्राह्मण पंडित केवळ स्वत:च्या स्वार्थासाठी यवनांच्या संगनमताने हिंदूंतील इतरेजनांना धर्माच्या नावाखाली सतावत होते. देवादिकांचं भय दाखवून त्यांना लुबाडत होते. प्रसंगी त्यांच्यावर अत्याचारही करत होते.

निरक्षरता तर त्या वेळच्या समाजाचा सगळ्यात मोठा दुबळेपणा आणि अंधश्रद्धा ही समाजाला लागलेली व्याधी.

त्यामुळेही समाज जर्जर झालेला होता.

नेमक्या याच वेळी आणखीन एक दु:ख होतं समाजाचं.

समाजातले काही भेकड; मग त्यात हिंदू-मुसलमान दोघेही होते. वैयक्तिक जबाबदारी टाळून आणि तपस्या करून नि काहीशी सिद्धी प्राप्त करून त्याच्या जोरावर समाजातील दीनदुबळ्यांना छळत होते. यात जसे मुल्ला-मौलवी होते तद्वतच भोंदू साधू-संतही होते. चमत्काराच्या जोरावर निरक्षर, अंधश्रद्ध समाजावर आपला वचक बसवायचा नि मग त्या जोरावर त्यांच्याकडून आपल्याला हवं ते साध्य करून घ्यायचं हा हेतू असणार. त्यात पुरोहितही होते.

तपाचरणाने प्राप्त झालेली सिद्धी ही नेहमी मानवाच्या कल्याणासाठीच लागली पाहिजे, त्याने माणूस सुखी झाला पाहिजे, ही भावनाच मुळी या मुल्ला-मौलवी, साधु-संतांच्या मनात आली नव्हती. साहजिकच सामान्य माणूस या सर्व व्याधींनी एवढा ग्रस्त झालेला होता की, त्याचं जिणं म्हणजे कुत्र्या-मांजराचं जिणं झालं होते. माणूस माणसाला माणूस मानायला तयार नव्हता.

पण जेव्हा समाज अधर्माच्या व्याधीने ग्रस्त होतो, त्याला जगणं मुश्कील होतं. त्याच्या दु:खाला पारावर उरत नाही तेव्हा परमेश्वर कुणाच्या ना कुणाच्या रूपात पुढे येतो आणि अत्याचाऱ्यांना शासन करून धर्माचं रक्षण करतो, हा या भूमीचा इतिहासच आहे.

कौरवांच्या उन्मत्ततेला आवर घालण्यासाठी श्रीकृष्ण धावलेच होते ना ? परस्त्रीहरण करणाऱ्या रावणाच्या पापाचरणाला आवर घालण्यासाठी श्रीराम पुढे सरसावलेच होते ना ? संतानीही केवळ त्याचसाठी जन्म घेतला असावा.

नानकदेवही कदाचित याचसाठी पृथ्वीतलावर अवतरले असावेत.

पंजाब पाहात असताना नानकदेवांबद्दलच्या अनेक कथा माझ्या कानावर आल्या... यवनांच्या दहशतीखाली वावरणारा त्या वेळचा समाज...

अशा अवस्थेत केवळ हिंदूंनाच नव्हे तर मुस्लिमांनाही केवळ आपल्या वाणीने जिंकणाऱ्या नानकदेवांचा थोरपणा त्याच वेळी माझ्या मनात भरला होता.

अगदी बालपणातच नानकदेव इतरांच्यापेक्षा काहीसे वेगळे होते. वास्तविक बालपण हे हसण्या-बागडण्याचं-खेळण्याचं वय; पण नानकदेवांना यात फारसा रस कधीच वाटला नाही. उलट गावालगतच्या जंगलात निसर्गसान्निध्यात राहावे, तेथे जप-तप करणाऱ्या ऋषिमुनींच्या जीवनक्रमाचं निरीक्षण करावे, कुणी असाहाय्य म्हणून समोर आलाच तर त्याला शक्य तेवढी मदत करावी - मग ते अन्न, घरातली भांडी, कपडेलत्ते - काहीही असो !

त्यांच्या या वागण्यावरूनच त्यांच्या घरात कित्येक वेळा गदारोळ माजायचा. त्यांचे वडील त्यांना नको ते बोलायचे. आई पाठीशी घालायची, पण त्यांचे मन जाणून घेण्याचे काम त्यांची बहीण नानकी करायची ! कारण त्यांच्याप्रमाणेच नानकीलाही ईश्वराबद्दल मनापासून आकर्षण होतं.

अगदी बालवयापासूनच नानकदेवांना काही गोष्टींचा तिरस्कार होता. त्यात अंधश्रद्धा, स्वत:ची जबाबदारी टाळून जप-तप करणारे ऋषिमुनी, निरक्षर समाजाच्या अंधश्रद्धेचा फायदा उठविणारे मुल्ला-मौलवी, ब्राह्मण-पंडित नि शासक यवन, शिवाय पूर्वापार चालत आलेल्या रुढी-परंपरांचाही त्यांना तिटकारा होता.

नानकदेव स्वत: अत्यंत बुद्धिमान होते. त्यांनी हिंदू-धर्मग्रंथांबरोबरच कुराणादि अन्य धर्मियांचे ग्रंथही अभ्यासिले होते. त्यांच्याकडे जन्मत:च कवित्व होतं. त्यांची वाणी ओजस्वी नि मधुर होती. त्यांच्या सुरेल गायनात एवढी ताकद होती की, कुणीही त्यांच्याकडे आकर्षिला जायचा. त्यांच्या मुखावरील तेज हे जणू कर्णाला लाभलेल्या कवचकुंडलांपेक्षाही भव्य-दिव्य होतं. कारण हे तेजच समोरच्याला आपलं अस्तित्व विसरायला भाग पाडायचं नि त्यांची नजर एवढी तीक्ष्ण की, निमिषार्धात कुणाच्याही हृदयाचा ठाव घ्यायची !

नानकदेव अन्य साधू-संतांच्यापेक्षा काहीसे वेगळेच होते.

ते संत तर होतेच, परंतु प्रसंगी अन्यायाविरुद्ध खवळून उठणारे एक योद्धेही होते. कुणाही दारावर आलेल्या अतिथीला अंगावरचं वस्त्रही देण्यास न कचरणाऱ्या या महात्म्याने अल्प वयात आपल्या मौजीबंधनाच्या प्रसंगी जे बंड केलं, या बंडाची समर्थता ब्राह्मण पंडितांसमोर मांडली. आपल्या तत्त्वज्ञानाने पंडितांचे पांडित्यही निष्प्रभ करून त्यांच्यावर मात करण्यात यश मिळविलं. हे खरोखरच एका कुशल योद्ध्याला साजेसं कृत्य होतं.

प्रस्तुत कादंबरी वाचत असताना यातील अनेक प्रसंग असे आहेत की ते वाचल्यानंतर नानकदेव केवळ संतच नव्हते, ते योद्धाही होते याची प्रचिती वाचकांना नक्कीच येईल.

सर्व-संग-परित्याग करून म्हणजेच आपली जबाबदारी टाळून परमेश्वरनिर्मित शरीराला खडतर तपाचरणात ढकलून त्याला क्लेष देणाऱ्या नि समाजाचा भार बनून राहिलेल्या तपस्व्यांबद्दल त्यांच्या मनात अपार कीव होती.

आणि म्हणूनच त्यांनी ध्यानधारणा केली. मात्र तपाचरण कधीच अंगीकारलं नाही. त्यांनी विवाह केला. त्यांना दोन मुलंही झाली. स्वत:ला नोकरीच्या जोखडाला बांधूनही घेतलं; मात्र मन केवळ एवढ्या मर्यादित जगात त्यांनी स्वत:ला कधीच कोंडू दिलं नाही. उलट सगळं जगच त्यांनी स्वत:चा संसार मानला आणि मग ह्याच जगाच्या कल्याणाचा भार स्वत:च्या माथ्यावर घेऊन ते संसारी पुरुषासारखे वागले.

नानकदेवांना केवळ संत म्हणणे, योद्धा समजणे म्हणजे त्यांच्या कार्याला संकुचित बनविण्यासारखं होईल. कारण त्यांच्या जीवनाचं आणखीन एक वैशिष्ट्य म्हणजे ते क्रांतिकारकही होते आणि ते त्यांनी आपल्या आचारांतून, विचारांतून नि कृतीतून समाजाला दाखवून दिले होते.

त्यांनी त्या वेळच्या समाजरचनेलाही जागतिक दु:खाचं प्रमुख कारण मानलं होतं. श्रीमंत हा स्वत:तला माणूस मारून, समोर उभ्या असलेल्या माणसाला हीन-दीन समजून त्याच्याच रक्तामांसावर पोसलेले एक हिंस्र श्वापद आहे असं त्यांचं मत होतं आणि जोवर हा भेद नाहीसा होत नाही तोवर माणूस माणूस म्हणून जगूच शकत नाही हे त्यांनी आपल्या वाणीतून आपल्या अर्थपूर्ण पदांतून समाजाला दाखवून दिले होते. एवढंच नव्हे, तर समाजातल्या असंख्य धनिकांचं मतपरिवर्तन करून त्यांनी त्यांना माणसात आणले होते.

वर्णभेद त्यांनी कधीच मानला नव्हता. जातिभेदाला त्यांनी कधीच प्रोत्साहन दिले नव्हते. यवन शासक असतानाही त्यांनी बेडरपणाने सांगितले होते, 'ना कोई हिंदू, ना मुसलमान !'

त्यांच्या दृष्टीने प्रत्येक माणूस हा माणूसच होता आणि ती ईश्वरनिर्मित अमोल वस्तू होती. तिची इज्जत करणं, तिला समानतेने वागविणं हे माणूस म्हणवून घेणाऱ्या प्रत्येकाचे कर्तव्य होतं.

त्यांनी हे समाजाला पटवून देऊन त्या वेळी समाजात क्रांतीही घडवून आणली होती. शासक कोण असावा याबद्दल त्यांचं काहीच मत नव्हतं. मात्र शासक कसा असावा याबद्दल मात्र ते आग्रही होते. शासक म्हणून मिरविणाऱ्या यवनांबद्दल नानकदेवांना अपार घृणा होती. अर्थात त्याचं कारण ते यवन आहेत म्हणून नव्हे. कारण ते स्वत: 'ना कोई हिंदू ना कोई मुसलमान' तत्त्वाचे प्रथम पुरस्कर्ते होते. मात्र हे शासक प्रत्यक्ष आपल्या धर्मग्रंथ-कुराणाच्या आदेशाचंही पालन करत नव्हते. नानकदेवांच्या मते, 'धर्म' हा एकच आणि त्याची तत्त्वेही सारखीच !

पण यवन सत्तांध तर होतेच, शिवाय धर्मद्वेष्टे होते. त्यांच्या दृष्टीने अन्य धर्मीय काफिर ! त्यांना माणूस म्हणून जगण्याचा हक्कच नाही. त्यांना जर माणूस म्हणून जगायचं असेलच तर प्रथम आपला धर्म सोडावा. यवन म्हणवून घ्यावं आणि मग त्यांच्या ताटाखालचं मांजर बनून राहावं. काफिरांची संपत्ती, एवढंच काय त्यांच्या लेकी-बाळीही आपलीच मालमत्ता समजत ते, नि मग त्यांच्याशी बिनदिक्कतपणे दुर्वर्तन करीत. त्यांना आपल्या बटीक, शय्यासोबतीणी बनवत.

म्हणूनच केवळ यवनांचीच वस्ती असलेल्या बगदाद शहरात नानकदेवांनी त्यांच्या धर्मभ्रष्ट आचरणांचा आलेख त्यांच्यासमोर मांडला होता. सैय्यदपूर बेचिराख करून टाकणाऱ्या हिंस्र बाबराला ठाम स्वरात सांगितलं होतं, 'तुला शासक म्हणवून घ्यायचंच असेल तर हे धर्माचं वेड डोक्यातून काढून टाक. रयत कोणत्या धर्माची आहे हे कधीच पाहू नकोस. तो एक आपल्याचसारखा माणूस आहे आणि त्याला माणसासारखं वागवणं आपलं कर्तव्य आहे असं समज. निरपराध्यांची हत्या हे सर्वस्वी पाप आहे आणि ते खुदालाही मंजूर नाही. जेव्हा तू असं वर्तन करशील तेव्हाच खुदा तुझ्या पाठीशी उभा राहील अन्यथा तुझं शासन उलटवून लावायला त्याला फारसा वेळ लागणार नाही.'

यवन-सत्ता असताना यवनांच्या दुष्कृत्यांचा पाढा त्यांच्यासमोर मांडणं ही सामान्य बाब नव्हती. अन्य कुणी हे साहस केलंच असतं तर यवनांनी त्याचं मस्तक तेव्हाच धडावेगळं केलं असतं.

पण नानकदेवांच्या मुखावरचं तेज, त्यांची प्रभावी वाणी, त्यांचा बेडर भाव, सदाचरण, समाजाकडे पाहाण्याची त्यांची दृष्टी, त्यांची मतप्रणाली आणि त्यांनी आपल्या अर्थपूर्ण-प्रभावी पदांनी जिंकलेली यवन-हिंदू माणसं.. त्यांची मनं-त्यांचा असंख्य शिष्यवर्ग... केवळ यामुळेच त्यांना हे शक्य झालं. त्यांचा धर्म केवळ एका तत्त्वावर आधारलेला होता -

'माणसाने माणसाशी माणसासारखं वागावं.'

बस्स, एवढंच ! पण यात जातिभेदाच्या प्रचंड भिंतींना हादरवून टाकण्याची ताकद होती. धर्मांना सुरुंग लावण्याचं बळ होतं ! आणि माणसाला एका प्रेमरज्जूत बांधण्याचं सामर्थ्य होतं.

नि घडलंही तसंच.

हिंदू, मुस्लीम ब्राह्मण, हरिजन-गिरिजन, श्रीमंत-गरीब सारे एकत्र आले. कर्तारपुरात त्यांनी या सगळ्यांचं एक नवं जग वसवलं. इथंच प्रत्येकाला श्रमाचं महत्त्व पटलं, परमेश्वराचं माहात्म्य कळलं. त्याग, सदाचाराची प्रकर्षाने जाणीव झाली.

नानकदेवांचा चमत्कारांवर बिलकुल विश्वास नव्हता. मात्र तन-मन एकाग्र करून सामान्य माणसालाही अप्राप्य अशा परमेश्वराची प्राप्ती करता येते यावर त्यांचा विश्वास होता. जप-तपाने साध्य झालेली सिद्धी जनकल्याणासाठीच लागली पाहिजे असा त्यांचा आग्रह होता आणि म्हणूनच हिमालयात वास्तव्यास असलेल्या ऋषिमुनींनी त्यांना जेव्हा विचारले - ''खाली काय चालले आहे?''

तेव्हा त्यांनी ताडकन उत्तर दिले, ''समाजाला तारणारे-मारणारे भेकडासारखे इथं हिमालयात दडी मारून बसल्यावर खाली राहाणारे अज्ञानी जीव काय करणार ? ते अंधश्रद्धा, सत्ता, शासक यांच्या अत्याचारांचे बळी ठरत आहेत. माणूस माणसाचा वैरी बनला आहे. त्याने प्रत्यक्ष विश्वनिर्मात्याला आवाहन केले आहे. आता केवळ प्रलय होणे बाकी आहे.''

भारतभूमी ही ऋषिमुनींची भूमी.

संतांची भूमी.

पुण्यवंतांची भूमी...

तरीही नानकदेव यात अग्रणी होते. हे प्रत्येकाने नि:संदिग्धपणे कबूल करायलाच हवे. कारण नानकदेव ध्यानधारणेत ऋषिमुनी वाटत... एकतारीवर सुरेल आवाजात गात असताना संत भासत... नि अंधश्रद्धा वा शासकीय अन्याय यांच्या विरोधात उभे राहात तेव्हा ते एखाद्या महान योद्ध्याचं रूप घेऊन आपल्यासमोर उभे ठाकत.

ही तीनही रूपं एकत्र असणारा माणूस एकच आणि - तो म्हणजे नानकदेव!

नानकदेव जसे बुद्धिमान होते तद्वतच चतुर होते. माणूस गोळा करण्याच्या त्यांच्यापाशी अनेक युक्त्या होत्या, जेणेकरून पाहाणाऱ्याचे आपल्यावरच लक्ष केंद्रित होईल असंच काहीतरी ते वागत आणि त्यांच्या प्रत्येक वेळच्या वागण्याला तसं यशही येई.

एक तर ते वेळोवेळी असा काही विचित्र पोषाख परिधान करीत की, पाहाणाऱ्यांचं त्यांच्यावरच लक्ष केंद्रित होई.

त्यांचा सुमधुर आवाज आणि त्यांची अर्थपूर्ण पदं हे तर सगळ्यांचंच आकर्षण होतं. त्यांनी देशोदेशीचा प्रवास केला. मात्र ते जिथं गेले, तिथल्या लोकांशी त्याच भाषेत बोलले. साहजिकच परदेशातही त्यांच्याबद्दल आपलेपणा निर्माण झाला.

त्यांच्या मुखावरचं तेजही रथी-महारथींची मनं जिंकण्याचं एक समर्थ साधन होतं. धर्माबद्दलची त्यांची मतप्रणाली सर्वांना समानतेची शिकवण देणारी होती. अन्यायी सत्ता नि मुजोर धर्ममार्तंडांना खाली खेचण्यासाठी बहुजन समाजाने एक व्हायला हवे... जात-पात, धर्म विसरायला हवा... हा अन्यायाचा प्रतिकार करण्याचा नि ईश्वराला आपलंसं करण्याचा एकमेव राजमार्ग होय, हेच त्यांचं प्रतिपादन होतं.

सर्व जगालाच आपला संसार मानण्याची त्यांची विशाल दृष्टी नि जगदोद्धारासाठी त्यांनी केलेले अखंड परिश्रम हा सगळ्या जगाचा कौतुकाचा विषय होता आणि म्हणूनच त्यांना माणूस मिळत गेला. सर्व धर्मांचा, सर्व जात-पातींचा त्यांचा शिष्यवर्ग एवढा पसरला की, त्याने देशोदेश काबीज केले.

बालवयात व्यापारासाठी दिलेला पैसा साधूंची क्षुधा शांत करण्यासाठी नानकदेवांनी ज्या ठिकाणी खर्च केला त्या ठिकाणी आजही एक गुरुद्वारा आहे. त्याचं नाव आहे 'खरा सौदा' !

ज्या तलावाच्या काठी बोराच्या झाडाखाली बसून नानकदेवांनी काही काळ ईश्वर चिंतन केले होते तिथंच अमृतसरचं सुवर्णमंदिर उभं राहिलं नि ते बोराचे झाड दु:खहर्ते बोराचे झाड या नावाने प्रसिद्ध आहे.

कर्तारपूर तर प्रत्यक्ष नानकदेवांनीच उभी केलेली वस्ती.

असे एकच काय, अनेक गुरुद्वारे, भोजनालये आजही आपण पाहू शकतो - नानकदेवांच्या चरणस्पर्शाने ती भूमी पुनीत झाली होती आणि म्हणूनच आज तिथं भुकेलेल्यांना अन्न, तहानलेल्याला पाणी नि निराधारांना आसरा मिळतो.

नानकदेवांच्या नंतरही यवनच शासक राहिला. सत्तेसाठी आप्तांची, भाऊबंदांची हत्या करून सत्ता प्राप्त करण्याची सवयच लागलेल्या यवनांची सगळी कारकीर्दच मुळी भ्रष्टाचारी, अन्यायी नि रक्तलांच्छित. सत्ताप्राप्तीसाठी ज्यांनी स्वधर्मियांची कत्तल केली तिथं अन्य धर्मियांना शांतता, स्थैर्य नि न्याय मिळणं शक्य तरी होतं का ? सत्तांध नि मदांध यवनांनी सत्ता हस्तगत होताच निष्पाप काफिरांचाही खात्मा करायला सुरुवात केली. अन्य धर्मियांना बाटविणे, त्यांची संपत्ती लुटणे, त्यांच्या आया-बहिणींनी आपला जनानखाना भरून त्यांच्यावर अत्याचार करणे, त्यांची देवळं पाडणे, मूर्ती फोडणे... नेहमीचंच झालं. इतर धर्मियांना जगणं मुश्कील झालं. यातून शीख सुटला नाही, रजपूत सुटला नाही, मराठा सुटला नाही, ब्राह्मण वा इतरेजनही सुटले नाहीत.

सर्व-धर्म-समभावाचा टेंभा मिरविणाऱ्या अकबरानेही चितोडचा पाडाव केल्यानंतर शरण आलेल्या तीस हजार राजपूत स्त्रिया, अपंग, मुलं, वृद्ध यांची निर्घृण हत्या केली होती हा इतिहास आहे.

पस्तीस-छत्तीस वर्षांपूर्वी नानकदेवांच्या सारख्या एका संतयोद्धयाने आपल्या अविस्मरणीय कर्तृत्वानं माझं मनोमंदिर जिंकलं.

पण ते ज्वलंत, जिवंत नि आदरणीय चरित्र शद्बांकित करण्याची इच्छा नव्हे, संधी-मला तब्बल बत्तीस-तेहत्तीस वर्षांनी लाभली.

मी काहीशा, मानसिक अस्वस्थतेतच नानकदेवांचं चरित्र शद्बांकित करीत होतो, केवळ एकाच हेतूने -

आज नानकदेवांचं विस्मरण घडलंय समाजाला... सत्तेच्या हव्यासापायी त्यांच्यातलं मनुष्यत्वच सरलं... रावण बनलाय तो...

पण जेव्हा अन्यायी रावण मदांध बनतो, अत्याचार करतो, धर्म बुडवू पाहातो तेव्हा त्याच्या परिपत्यर्थ कुणाच्या ना कुणाच्या रुपात परमेश्वर भूतलावर अवतरतो - अगदी नानकदेवांच्या रुपातही!

आणि मग अन्यायाचं पारिपत्य होतं. सैतान लयाला जातोच. उरतो फक्त एकच संदेश-माणसाने माणसाशी माणसासारखं वागावं. नानकदेवांनी हेच तर सांगितलं होतं.

सैय्यदपूर बेचिराख करणारा बाबर गेला. तीस हजार निष्पाप राजपूतांचा क्रूर संहार करणारा अकबर गेला, रावण गेला, राम गेले, नानकदेवही गेले. जो येतो त्याला जावेच लागते; पण ज्याला आपण जायचे आहे याची जाणीव असते, तो धर्म सोडत नाही, जीवनतत्त्वांना तिलांजली देत नाही. मात्र ज्याला आपणाला एक ना एक दिवस जायचं आहे याचं विस्मरण घडतं तो सत्तेच्या मागे लागतो, मदांध बनतो, स्वैराचाराचं थैमान मांडतो.

स्वातंत्र्यानंतरच्या गेल्या सत्तेचाळीस वर्षांच्या कालावधीकडे पाहिल्यानंतर याची आपल्याला पुरेपूर प्रचिती येते.

आखाड्यात उतरलेले सत्तास्पर्धक आपण जाणार आहोत हेच विसरलेत नि सत्तेसाठी सुंदोपसुंदी करू लागलेत. सत्ता प्राप्त होताच मदांध होऊन आपल्या बगलबच्च्यांना स्वैर वर्तणुकीचा परवाना देऊन मोकळे झालेत. त्याचाच परिणाम म्हणून भ्रष्टाचाराला ऊत आला आहे. सारा देशच स्वार्थ, मोह, भ्रष्टाचार, विषयांधता यांनी ग्रासलेला आहे. यातूनच अतिरेकी जन्माला आले आहेत. जम्मू-काश्मीर मधील अशांतता नि त्याला लाभलेलं पाकिस्तान्यांचं पाठबळ, आसामातील बोडो समस्या, बोफोर्स प्रकरण-शेअर घोटाळा प्रकरण, मुंबईतले बॉम्बस्फोट, जळगाव-भुसावळमधील स्त्रियांच्यावरील पाशवी अत्याचार, रिंकू पाटील- मानसी शहा सारख्या निरागस अन् निष्पाप पोरींची वासनांधांच्याकडून झालेल्या अमानुष हत्या...

रोज नवं-नवं ऐकायला मिळतं, पाहायला मिळतं, वाचायला मिळतं. नि मग वाटतं, नानकदेवांच्यासारखा कुणीतरी तेजस्वी पुरुष अचानक कुठूनतरी यावा, त्याने जनमानस जिंकावा. आपल्या ओजस्वी, पण सडेतोड वाणीने सत्तांध-मदांधांचा नक्षा उतरावा, त्यांना त्यांच्या दयनीय भविष्याची जाणीव करून द्यावी.

नानकदेवांच्या चरित्राचा अभ्यास केल्यानंतर नि प्रत्यक्ष कादंबरी लेखनाला सुरुवात करून ती संपवेपर्यंतच्या तीन-साडेतीन वर्षात घडलेल्या, पाहिलेल्या, वाचलेल्या अनेक घटना-प्रसंगांनी अनेक वेळा मन विदीर्ण करून टाकलं. अस्वस्थतेमुळे कित्येक वेळा लेखन थांबलं. परंतु तरीही एक ना एक दिवस हे थांबणार आहे, कुणीतरी हे थांबविणार आहे, अन्यथा

हे जग चालणारच नाही याची ग्वाही नानकदेवांच्या चरित्रानेच मला दिली नि मी लिहिता झालो, लिहितच गेलो.

अखेर आज ही कादंबरी वाचकांसमोर ठेवण्याचा योग आला.

मराठीतलं नानकदेवांच्यावरचं एवढं मोठं पुस्तक कदाचित माझंच असावं - पुस्तक मोठं नाहीच; चरित्रच एवढं भव्य-दिव्य आहे की, ते पूर्णत: शद्बांकित करायला शेकडो पानं पुरायची नाहीत. मी शक्य तेवढी मर्यादा सांभाळूनच हे लिहिलं आहे आणि भरभरून समाधान पावलो आहे.

छत्तीस वर्षांपूर्वी मनोमंदिरात घर करून राहिलेलं एक अजोड व्यक्तिमत्त्व आपल्यासमोर उभं केलं आहे. अर्थात ते कितपत यशस्वी झालं आहे हे तुम्ही ठरवायचं आहे. मात्र यात जे चांगलं आहे ते नानकदेवांचं आहे आणि जिथं उणिवा आहेत त्या माझ्या स्वत:च्या आहेत, हे मी इथं प्रांजलपणानं नमूद करतो आहे.

मी शासनमान्यता प्राप्त झालेला लेखक नाही, मात्र वाचकप्रियता भरभरून वाट्याला आली आहे माझ्या. माझ्या वाचकाचं प्रत्येक पत्र हे शासनमान्यतेहून श्रेष्ठ समजणारा आहे मी - आणि म्हणूनच एक निवेदन-

बरं-वाईट काही असेना का, मला लिहा ! कारण तुमचे दोन शद्ब हे माझ्यासारख्या वृद्धत्वाकडे झुकलेल्या माणसाला संजीवनीसारखे आहेत.

शतकी कादंबऱ्या लिहिल्यानंतर वाटलं होतं, आता डोळे मिटायला रिकामा झालो. पण आता २६१ वी कादंबरी पूर्ण केल्यानंतरही वाटतंय आणि लिहावं...

पण असं म्हणणं एवढंच आपल्या हातात आहे, नाही का ?

मी एक माध्यमिक शाळेतील निवृत्त शिक्षक. विद्यार्थ्यांसमोर काही ना काही आदर्श ठेवण्याची सवयच लागून राहाते शिक्षकाला. त्यात एखाद्याला साहित्यक्षेत्रात काही करून दाखविण्याची संधी मिळाली तर तो त्याचा पुरेपूर फायदा उठविल्याशिवाय राहात नाही. आजवर मीही हेच केलंय.

इतिहासातील काही आदर्श चरित्रं कादंबरी-रुपानं माझे विद्यार्थी नि वाचक यांच्यासमोर ठेवली आहेत. त्यात छ. संभाजी, छ. शहाजी, महाराणी ताराबाई, महाराणी येसूबाई, महाराणा प्रताप, राणी पद्मिनी, पितामह भीष्म, आचर्य द्रोण, द्रोणपत्नी गौतमी आणि आता नानकदेव ! छ. शिवयायांच्यावरील 'गरुडझेप' ही कादंबरीही अमोल प्रकाशन, पुणे यांच्या सौजन्याने बाजारात आली आहे.

मला आणखीन चार-सहा ऐतिहासिक चरित्रं कादंबरीरूपानं माझे विद्यार्थी नि वाचकांना सादर करायची आहेत. सध्या मी त्याचीच जुळवाजुळव करतो आहे. या कामी यश देणं नि हे काम माझ्या हातून पूर्ण करून घेणे हे सर्वस्वी त्या विघ्नहर्त्या गणेशाच्या हाती !

अधिक काय लिहावे ?

नानकदेवांच्या निमित्ताने माझ्या एका नव्या कलाकृतीला वाव मिळाला आहे. त्याचं आपण कसं स्वागत करता हे सर्वस्वी आपल्यावरच अवलंबून आहे.

आपल्या प्रतिक्रिया जरूर कळाव्यात, हीच विनंती.

**- अनंत तिबिले**
'अस्मिता'
दीपसेवक गृहनिर्माण संस्था,
आर.के.नगर,
कोल्हापूर - ४१६ ०१३

# १

तलवंडी गाव सध्या पाकिस्तानात आहे. याच तलवंडी गावातील तहसीलदार कालू मेहताच्या घरात कालू मेहता अस्वस्थपणे येरझारा घालत होता. वैशाख शुद्ध तृतीयेचा दिवस. तारीख होती चौदा एप्रिल.

कालू मेहता एक सभ्य, प्रामाणिक आणि इमानदार माणूस होता. म्हणून तर जमीनदार राय बुलारांचा त्यांच्यावर विश्वास होता. स्वत: कालू मेहता हिंदू. 'वेदी' वंशाचा क्षत्रिय.

या उलट जमीनदार राय बुलार मूळचे हिंदू. त्यांचे पिताजी भुई यांना दिल्लीपतीने तलवंडी आणि त्याच्या आसपासची बारा गावं इनामात दिलेली होती आणि त्या मोबदल्यात त्यांना मुसलमान बनविण्यात आलं होतं.

मुसलमान-हिंदूंत धार्मिक तेढ असल्याचा काळ तो. परस्पर एकमेकांचे द्वेष्टे. यवन धर्मांध. मात्र अन्य धर्मियांचे कट्टर दुष्मन. मात्र भुई वा त्यांचा पुत्र बुलार यांच्या मनात हिंदूंच्याबद्दल बिलकूलही तेढ नव्हती. उलट बारा गावांची जमीनदारी पदरात पडल्याने या बारा गावांतील हिंदू-मुस्लीम ही त्यांचीच प्रजा होती आणि त्यांना समभावाने वागविणे हे आपले परमपवित्र कर्तव्य आहे हे त्या दोघाही पिता-पुत्राला ज्ञात होते.

साहजिकच तहसीलदार कालू मेहता हिंदू असूनही त्यांच्या गळ्यातला ताईत बनलेला होता. राय बुलारांचे कालू मेहताच्या घराण्यावर आत्यंतिक प्रेम होते. घरोब्याचे संबंधही होते. त्यात कालू मेहता सरळमार्गी, व्यवहारी नि नाकासमोर चालणारा उद्योगप्रिय प्रामाणिक माणूस असल्याकारणाने ते त्याचा मधून मधून सल्लाही घेत असत.

म्हणूनच तर तलवंडीकर कालू मेहताला मान देत.

त्याचा शद्ब वरच्यावर झेलत.

प्रसंग पडलाच तर न्यायासाठी प्रथम त्याचा दरवाजा ठोठावत; पण आज स्वत: कालू मेहतालाच चिंतेने ग्रासले होते. व्यथेने पिडले होते.

आणि तो आपली व्यथा एकट्या परमेश्वराशिवाय अन्य कुणापुढेही मांडू शकत नव्हता. तो येरझारा घालत मध्येच थांबे - दोन्ही हात जोडी, डोळे मिटी. श्रद्धेने पुटपुटू लागले, ''परमेश्वरा, सुटका कर रे... खरंच सुटका कर. मला हे विव्हळणे... कण्हणे ऐकवेनासे झाले आहे माझी तृप्ता या अशा असाहाय्य अवस्थेत तडफडत असलेली पाहावेनासे झाले आहे. म्हणून म्हणतो, सुटका कर... सकुशल लवकर सुटका कर...''

तो बाहेर हा असा चिंतेने येरझाऱ्या घालत होता -

आणि आत त्याची पत्नी तृप्ता तडफडत होती. तिच्या पोटातून असह्य वेदना उठत होत्या. त्या सहन न होऊन ती कण्हत होती, विव्हळत होती. माशासारखी तडफडत होती.

सुईण आपल्या मऊशार-नाजूक हाताने तिचं ओटीपोट चाचपत होती. आपल्या अनुभवी नाजूक हाताने मधूनच पोट दाबत होती... शेजारी उभ्या असलेल्या नोकराणीला काही बहुमोल सूचना करीत होती. मधूनच तृप्ताला उद्देशून म्हणत होती, ''पोरी, नऊ मास नऊ दिस हे ओझं बाळगलंस, केवळ मातृत्वासाठी - आता केवळ काही काळ कळ काढ. सहन कर... अगं, सहन करणं एवढंच स्त्रीजातीच्या नशिबी असतं. तूच अशी ही अगतिक बनून तडफडू लागलीस तर नव्याने जन्म घेणाऱ्या त्या इवल्या जिवाने जन्म तरी कसा घ्यावा ? कशी ही दुनिया पाहावी ? वेडे, सोस... आणखीन काही काळ. ती घडी आता काही दूर नाही...'

आणि वेदना थांबल्या -

कण्हणं थांबलं.



विव्हळणं संपलं...

कालू मेहता सुखावला.

त्याचं लक्ष समोरच्या खोलीकडे गेले.

दरवाजा बंद होता. त्याला वाटले, धावत दरवाजाच्या दिशेने जावे, दरवाजा उघडावा, आता प्रवेश करावा आणि आपल्या तृप्तीला नि तिने आपल्यासाठी आणलेला नजराणा डोळे भरून पाहावा... तृप्तीने जे सहन केलं त्याच्या मोबदल्यात तिच्या पाठीवरून हात फिरवावा. तिला मधुर शद्बांत धीर द्यावा. तिचं सांत्वन करावं.

त्याने दरवाजाच्या दिशेने आपले पाऊल उचललेही -

पण तरीही त्याचे पाऊल अडखळले.

एक अनामिक भय त्याच्या मानेवर स्वार झाले.

एका नव्या चिंतेने त्याला ग्रासले.

तो स्वत:शीच पुटपुटू लागला, ''थोड्या वेळापूर्वी कानावर येणारं विव्हळणं थांबलं; पण... नानकीच्या वेळेला कण्हणं थांबल्या-थांबल्या त्या नव्या जिवाचं रडणं कानावर आलं होतं. नाहीतरी मूल जन्माला येतं तेव्हा ते रडतंच. ते जिथं जन्मतं, तो परिसर त्याच्या रडण्याने भरून जातो. मग आताची ही शांतता ? ... काही बरं-वाईट तर झालं नसेल ना ? आपली तृप्ता.. तृप्ता ठीक तर असेल ना ? हे परमेश्वरा, तू तिच्या जिवाला काही अपाय...''

चारच दिवसांपूर्वी घडलेली एक घटना त्याला आठवली -

✧✧

तलवंडीतीलच...

त्याच्याच मोहल्ल्यातील -

महंमदच्या घरची.

त्याची पत्नी नूर पहिल्यांदाच गरोदर होती.

कालूला हे ठाऊक होतं.

कारण त्याच्याच हाताखाली काम करणाऱ्या महंमदनेच ते त्याला सांगितलं होतं -

तो मोठ्या खूषित म्हणाला होता, ''मेहताजी, आता मी बाप बनणार आहे !''

''खरं की काय ?''